महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २२६२०३०४
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 22620304
Web: www.msbae.ac.in | Email: director.msbae@gmail.com

क्रमांक-कशिमं/प्रथमसत्र २०२५-२६/पाच/1256 दिनांक:- 1- 2 DEC 2025

वाचावे : १) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/प्रसत्र-२०२५-२६/पाच/१११११, दिनांक ३०.१०.२०२५
२) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/प्रसत्र-२०२५-२६/पाच/१११८, दिनांक ०३.११.२०२५
३) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/प्रसत्र-२०२५-२६/पाच/११९८, दिनांक १७.११.२०२५
४) कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र.कशिमं/प्रसत्र-२०२५-२६/पाच/१२०६, दिनांक १९.११.२०२५

## परिपत्रक

विषय : <u>शासकीय उच्चकला परीक्षा- प्रथम सत्र (शैक्षणिक वर्ष २०२५-२६)</u>
परीक्षा आयोजनाच्या अनुषंगाने आवश्यक सूचना.

उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ वरील परिपत्रकान्वये शासकीय उच्चकला प्रथम सत्र परीक्षेकरिता संलग्नित कला परिसंस्थांची नोंदणी करण्याबाबत तसेच क्र. ४ वरील परिपत्रकान्वये परीक्षेस पात्र असलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांची नोंदणी/परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, संदर्भाधीन क्र. ३ वरील परिपत्रकान्वये प्रथम सत्र परीक्षेचे अंतिम वेळापत्रक प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यानुसार, शासकीय उच्चकला परीक्षा प्रथम सत्र परीक्षा दिनांक ०३.१२.२०२५ ते २०.१२.२०२५ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत. त्यानुषंगाने, पुढीलप्रमाणे आवश्यक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

०२. कला शिक्षण मंडळामार्फत पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या शासकीय उच्चकला प्रथम सत्र परीक्षा वेळापत्रकाप्रमाणे प्रात्यक्षिक व सैध्दांतिक स्वरुपात संलग्नित कला परिसंस्थांवर/परीक्षा केंद्रांवर आयोजित करण्यात याव्यात. त्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व प्रात्यक्षिक व सैध्दांतिक विषयांच्या प्रश्नपत्रिका संबंधित विषयाच्या परीक्षेच्या १ दिवस अगोदर सकाळी ११.०० वाजता ऑनलाईन पध्दतीने कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात येतील. लॉगिनवर प्राप्त होणाऱ्या प्रश्नपत्रिकांच्या विद्यार्थी संख्येनुसार गोपनीयरित्या प्रिंट आऊट काढाव्यात व सदर प्रश्नपत्रिका अभ्यासक्रमनिहाय स्वतंत्र लिफाफ्यात मोहोरबंद करुन कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांनी आपल्या अभिरक्षेत ठेवाव्यात. परीक्षेची गोपनीयता विचारात घेऊन मोहोरबंद केलेल्या प्रश्नपत्रिका प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्यापूर्वी विद्यार्थ्यांच्या समक्ष ०२ परिक्षार्थींच्या स्वाक्षरीने उघडण्यात येऊन पाकीटावर मोहोरबंद पाकीट उघडण्याची वेळ नमूद केल्यानंतर विद्यार्थ्यांना वाटप करण्यात याव्यात. प्रश्नपत्रिकांची गोपनीयता राखण्याची संपूर्ण जबाबदारी कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांची राहील.

०३. प्रात्यक्षिक (Practical) विषयांच्या परीक्षेचे (Semester End Examination) आयोजन व मुल्यांकन याबाबत कला शिक्षण मंडळाचे परिपत्रक क्र. कशिमं-२०२५/सात/प्रात्यक्षिक परीक्षा/१०१७, दिनांक १०.१०.२०२५ मध्ये नमूद केलेल्या मार्गदशक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

०४. उपरोक्त परिपत्रकानुसार प्रात्यक्षिक विषयांच्या परीक्षेसाठी संबंधित विषय शिकविणाऱ्या अध्यापकांची अंतर्गत परीक्षक म्हणून (Internal Examiner) व इतर अध्यापकांची बाह्य परीक्षक ( External Examiner) म्हणून कला परिसंस्था स्तरावर नियुक्ती आदेश निर्गमित करावे व आदेशाची प्रत कला शिक्षण मंडळास परीक्षा सुरु होण्यापूर्वी सादर करावी. सदर अंतर्गत व बाह्य परीक्षकांकडून प्रात्यक्षिक विषयांचे मुल्यांकन करुन उच्चकला परीक्षेच्या लिंकवर उपलब्ध असलेल्या निकालपत्रकात ऑनलाईन गुण भरावे.

०५. प्रात्यक्षिक आणि सैध्दांतिक एकत्रित असणाऱ्या विषयांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकनही वरीलप्रमाणे नियुक्त करण्यात येणाऱ्या परीक्षकांकडून करण्यात यावे. अशा विषयांचे विवरणपत्र सोबत जोडले आहे. सैध्दांतिक व प्रात्यक्षिक हा एकत्रित विषय असल्याने त्याच्या मुल्यांकनात समानता येण्यासाठी त्यांचे मुल्यांकन परीक्षा केंद्रावर होणे उचित आहे. त्या दृष्टीकोनातून सैध्दांतिक व प्रात्यक्षिक विषयांचे मुल्यांकन परीक्षा केंद्रावर करावयाचे आहे. सदर व्यवस्था केवळ या सत्राकरिता राहील.

०६. सोबतच्या विवरणपत्रात नमूद करण्यात आलेल्या विषयांव्यतिरिक्त इतर सैध्दांतिक विषयांच्या उत्तरपत्रिका (Semester End Examination) परीक्षा संपताच त्या त्या दिवशी मोहोरबंद करुन कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या अभिरक्षेत ठेवण्यात याव्यात व या कार्यालयाकडून जाहीर करण्यात येईल त्या मुल्यमापन केंद्रावर **दिनांक २४.१२.२०२५ पर्यंत** मुल्यांकनाकरिता जमा करण्यात याव्या.

०७. सैध्दांतिक विषयांसाठी लागणाऱ्या मुळ उत्तरपत्रिका सर्व संबंधित कला परिसंस्थांना विद्यार्थी संख्येनुसार (१०% जास्त) यापूर्वीच पाठविण्यात आलेल्या आहेत. तथापि, त्यापेक्षा अधिक उत्तरपत्रिकांची आवश्यकता भासल्यास मुंबई येथील मंडळाचे कार्यालय तसेच नागपूर व छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय येथून आवश्यक असलेल्या मुळ उत्तरपत्रिका घेऊन जाव्यात. त्याकरिता संबंधित कला परिसंस्थेचे पत्र/प्राधिकारपत्र सदर कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.

०८. पदविका/प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्र परीक्षा वेळापत्रकानुसार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी परीक्षा केंद्रावर कंडक्टर, सुपरवाझर, लिपिक, शिपाई इ. आवश्यक कर्मचारी वर्ग कला परिसंस्था स्तरावर नियुक्त करुन आदेशाची प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी. परीक्षा केंद्रावर नियुक्त करण्यात येणारे अध्यापक/कर्मचारी यांनी परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही, याची दक्षता घ्यावी. कंडक्टर व सुपरवायझर रिपोर्टचे नमुने उच्चकला परीक्षेच्या लिंकच्या होमपेजवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. परीक्षेच्या वेळापत्रकानुसार प्रथम सत्र परीक्षेचे आयोजन सुरळीतपणे पार पाडण्याची सर्वस्वी जबाबदारी कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांची राहील.

०९. यावर्षीच्या प्रथम सत्र परीक्षेपासून सत्र पध्दतीनुसार आयोजित करण्यात येणाऱ्या उच्चकला परीक्षेच्या केंद्र क्रमांकामध्ये बदल करण्यात येत असून यापुढे संलग्नित कला परिसंस्थांचे संलग्नता क्रमांक (Affiliation Code) हे त्यांचे परीक्षा केंद्र क्रमांक असतील. तथापि, जुन्या वार्षिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांकरिता यापूर्वी देण्यात आलेल्या परीक्षा केंद्र क्रमांकामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही, याची नोंद घेण्यात यावी.

१०. प्रथम सत्र परीक्षांच्या आयोजनाच्या अनुषंगाने आवश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी लागणाऱ्या अभ्यासक्रमनिहाय साहित्याच्या याद्या कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर यापूर्वीच उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

..३..

११. परीक्षा आयोजनादरम्यान विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती/अनुपस्थिती उच्चकला परीक्षेच्या **https://hae.semesterpattern.msbae.in/** या लिंकवर **Student Attendence** या टॅबमध्ये देण्यात आलेल्या प्रणालीमध्ये ऑनलाईन नोंदवणे अनिवार्य आहे. तसेच, विद्यार्थ्यांची दैनंदिन उपस्थिती/अनुपस्थिती ऑफलाईन नोंदविण्याकरिता नमूना उपस्थितीपत्रक उच्चकला परीक्षेच्या वरील लिंकवर **Notifications** या टॅबमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहे. सदर उपस्थितीपत्रकावर विद्यार्थ्यांच्या स्वाक्षरीसह दैनंदिन उपस्थिती/अनुपस्थिती नोंदवावी व सैध्दांतिक विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या मोहोरबंद केलेल्या गठ्ठयांसोबत सदर उपस्थितीपत्रक संबंधित मुल्यमापन केंद्रावर जमा करण्यात यावे.

१२. विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र व परीक्षा शुल्क ऑनलाईन सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेशपत्र (Hall Ticket) कुलसचिव/अधिष्ठाता/प्राचार्य यांच्या लॉगिनवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सदर प्रवेशपत्र तपासून संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा सुरु होण्याच्या एक दिवस अगोदर वाटप करण्यात यावे.

१३. प्रथम सत्र परीक्षेसंदर्भात काही शंका/अडचण उद्भवल्यास सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचेशी संपर्क साधता येईल.

१४. प्रस्तुत परिपत्रक कला शिक्षण मंडळाच्या **https://msbae.ac.in** या संकेतस्थळावरील **Circular** या टॅबमध्ये तसेच उच्चकला परीक्षेच्या **https://hae.semesterpattern.msbae.in/** या लिंकवर **Notifications** या टॅबमध्ये उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई

प्रति,

१) कुलसचिव, सर ज.जी. कला, वास्तुकला व अभिकल्प विद्यालय, मुंबई
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर
४) प्राचार्य, संलग्नित शासनमान्य अशासकीय कला परिसंस्था.

प्रत,

१) मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई.
२) निरीक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) सहाय्यक निरीक्षक, चित्रकला व शिल्प, विभागीय कार्यालय, नागपूर/छत्रपती संभाजीनगर
४) निवड नस्ती.

# विवरणपत्र

## थेअरी व प्रॅक्टिकल एकत्रित विषय असलेल्या विषयांची यादी

| Name of Program | Course Title | Course Code |
|---|---|---|
| Diploma in Applied Art | Design and Colour Fundamentals | 250312 |
| | Introduction to Advertising | 250314 |
| Diploma in Art Education | Print Making Techniques for Educators | 250612 |
| Art Master Certificate | Utility-Driven Design and Poster Design | 250712 |
| Art Teacher's Diploma | Colour Theory and Application | 250513 |
| Diploma in Art and Craft-Textile Design (Printing & Dyeing) | Design Fundamentals | 251013 |
| Diploma in Art and Craft-Textile Design (Weaving) | Design Fundamentals | 251013 |
| Diploma in Drawing and Painting | Two-Dimensional Design and Visual Narration | 250212 |
| Diploma in Sculpture and Modelling | History Of Indian Art- Part 1 | 250414 |
| | Sculpture Mediums Study -Part-1 | 250415 |
| Diploma in Art and Craft -Interior Decoration | Fundamentals of Design | 251211 |
| | Geometric Construction | 251214 |
| Foundation Certificate in Art and Design | Indian Traditional Folk Art and Craft | 250114 |

**टिप**:- वरील विषयाच्या थेअरी व प्रॅक्टिकलचे मुल्यांकन परीक्षा केंद्रावर करावे.

(स्मिता किंकळे)
सचिव,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,
मुंबई